प्रेसनोट

दिनांक २१/०३/२०२५

**"लोकसेवक श्री. अतुल अशोक आव्हाड, कनिष्ठ अभियंता, वर्ग–३, म.रा.वि.वि.कं.मर्या. आशागड शाखा, डहाणु उपविभाग, पालघर विभाग यांना यशस्वी सापळा कारवाई करून गुन्हा दाखल केलेबाबत"**

| | |
|---|---|
| लाचलुचपत प्रतिबंधक विभाग | लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, पालघर |
| पोलीस ठाणे | डहाणु पोलीस ठाणे जि.पालघर |
| गु.र.क्र. व कलम | ३२/२०२५<br>भ्रष्टाचार प्रतिबंधक अधिनियम १९८८ सुधारीत २०१८ चे कलम ७ अन्वये |
| आरोपी लोकसेवकाचे नाव व कार्यालय | श्री. अतुल अशोक आव्हाड, कनिष्ठ अभियंता, वर्ग–३, म.रा.वि.वि.कं.मर्या. आशागड शाखा, डहाणु उपविभाग, पालघर विभाग<br>सध्या रा. फ्लॅट नं. १११, निधी शेल्टर, गोपीपुरा, डहाणु पुर्व ता.डहाणु जि.पालघर |
| आरोपी अटक | श्री. अतुल अशोक आव्हाड, कनिष्ठ अभियंता, वर्ग–३, म.रा.वि.वि.कं.मर्या. आशागड शाखा, डहाणु उपविभाग, पालघर विभाग |
| मागितलेल्या लाचेची रक्कम | ३,००,०००/– रू. |
| स्विकारलेली लाचेची रक्कम | २,००,०००/– रू. |

**थोडक्यात हकीगत:–** तक्रारदार यांचा म्हशीचा तबेला असुन सदर तबेलाच्या वीज मीटर व्यतिरीक्त सर्विस केबल मधुन डायरेक्ट कनेक्शन करून तक्रारदार यांनी वीज चोरी केली असल्याचा तक्रारदार यांचेवर आरोप करुन त्याबाबत तक्रारदार यांच्यावर रुपये ७,००,०००/– दंडात्मक कारवाई न करण्याकरीता लोकसेवक श्री. अतुल अशोक आव्हाड, कनिष्ठ अभियंता यांनी रुपये, ३,००,०००/– लाचेची मागणी केलेबाबत तक्रार अर्ज दिनांक २०/०३/२०२५ रोजी ला.प्र.वि, पालघर यांचेकडे लेखी तक्रार केली होती.

तक्रारदार यांनी दिलेल्या तक्रारीच्या अनुषंगाने दिनांक २०/०३/२०२५ रोजी करण्यात आलेल्या पडताळणी दरम्यान लोकसेवक अतुल आव्हाड, कनिष्ठ अभियंता यांनी तक्रारदार यांचेवर वीज चोरीबाबत रुपये ७,००,०००/– दंडात्मक कारवाई न करण्याकरीता व वीज जोडणी पुर्नस्थापित करण्याकरीता ३,००,०००/– रुपये लाचेची मागणी केल्याचे निष्पन्न झाले. त्याप्रमाणे लागलीच करण्यात आलेल्या सापळा कारवाई दरम्यान नमुद लोकसेवक यांनी ३,००,०००/– रुपये लाचेच्या रक्कमेपैकी पहिला हफ्ता २,००,०००/– रुपये लाचेची रक्कम स्विकारतांना रंगेहाथ पकडण्यात आले, म्हणुन भ्रष्टाचार प्रतिबंधक अधिनियम १९८८ (सुधारीत २०१८) चे कलम ७ अन्वये डहाणु पोलीस ठाणे, जि.पालघर येथे गु.र.क्र. ३२/२०२५ अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

**मार्गदर्शक अधिकारी–** मा.श्री.शिवराज पाटील सो, पोलीस अधीक्षक, लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, ठाणे परिक्षेत्र,ठाणे
मा.श्री.संजय गोविलकर सो, अपर पोलीस अधीक्षक,लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, ठाणे परिक्षेत्र,
मा.श्री.सुहास शिंदे, अपर पोलीस अधीक्षक, लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, ठाणे परिक्षेत्र, ठाणे

लाचलुचपत प्रतिबंधक विभागातर्फे नागरीकांना आवाहन करण्यात येते की, भ्रष्टाचारासंबंधी काही माहिती असल्यास अगर लाच मागणाऱ्या लोकसेवकाबद्दल तक्रार असल्यास लाचलुचपत प्रतिबंधक विभाग,पालघर यांचेशी संपर्क करावा.

---


संपर्क पत्ता :– लाचलुचपत प्रतिबंधक विभाग,कार्यालय कक्ष क्र. १०८,
प्रशासकीय इमारत–'ब', जिल्हा मुख्यालय,पालघर–बोईसर रोड, कोळगाव,
ता.जि. पालघर. पिनकोड– ४०१४०४.
संकेतस्थळ:– https://www.acbmaharashtra.gov.in/
ई–मेल :– dyspacbpalghar-mum@mahapolice.gov.in
टोलफ्रीनं: :– 1064
दुरध्वनीक्रमांक :– 02525-297297


(हर्षल चव्हाण)
पोलीस उपअधिक्षक
लाचलुचपत प्रतिबंधक विभाग,पालघर